# पौलाचे फिलेमोनाला पत्र

ख्रिस्त येशूकरीता कैदी झालेला पौल, व आपला बंधु
तिमथ्य यांजकडून, आमचा प्रिय बंधु व सहकारी फिलेमोन
2आणि आमची बहीण अफ्फिया, अर्खिप्प, आमचा
सहसैनिक, आणि तुझ्या घरात जी मंडळी एकत्र येते,
यांना: 3देव आमचा पिता याजपासून व प्रभु येशू ख्रिस्तापासून
कृपा व शांति असो.

### फिलेमोनचे प्रेम आणि विश्वास

4जेव्हा मी प्रार्थनेत तुझी आठवण करतो, तेव्हा नेहमी
मी माझ्या देवाचे उपकार मानतो. 5कारण तुझ्या प्रेमाविषयी
आणि तुझ्या विश्वासाविषयी, जो विश्वास तू प्रभु येशूवर
ठेवतोस त्याविषयी मी ऐकतो, ज्या देवाच्या सर्व लोकांसाठी
जे प्रेम तुझ्याकडे आहे, त्याविषयी मी ऐकतो, 6मी अशी
प्रार्थना करतो की, ज्या विश्वासाचा सहभागी तू
आमच्याबरोबर आहेस, तो विश्वास आमच्यामध्ये
असलेल्या ख्रिस्त येशूमधील सर्व चांगल्या गोष्टी त्या
सखोलपणे समजण्यासाठी तुला मार्गदर्शन करोत. 7तुझ्या
प्रेमामुळे मला मोठा आनंद आणि समाधान मिळाले आहे.
कारण बंधु, तुझ्या प्रयत्नांमुळे देवाच्या लोकांची अंत:करणे
संजीवित झाली आहेत.

### अनेसिमचा भाऊ म्हणून स्वीकार कर

8म्हणून, जरी मी तुझा बंधु म्हणून तुला तुझे योग्य
कर्तव्य करण्याविषयी आज्ञा करून सांगण्याचे धैर्य असले,
तरी 9प्रेमामुळे मी तुला आवाहन करणे पसंत करतो. मी
पौल, एक वृद्ध मनुष्य म्हणून जसा आहे तसा स्वत:ला
सादर करतो आणि आता ख्रिस्त येशूमधील कैदीसुद्धा
असलेला असा,

10मी तुला माझ्या मुलासमान असलेला अनेसिम,
ज्याच्याशी मी तुरुंगात असताना पित्याप्रमाणे वागलो,
त्याजविषयी कळकळीने विनवितो की, 11पूर्वी तो तुला
निरुपयोगी होता पण आता तो तुलाच नाही तर मलासुद्धा
उपयोगी आहे.* 12मी त्याला तुझ्याकडे परत पाठवीत
आहे. मी असे म्हणायला हवे की, मी त्याला पाठवीत
असताना जणू काय माझे हृदयच पाठवित आहे. 13त्याला
येथे माझ्याजवळ ठेवायला मला आवडेल यासाठी की
सुवार्तेमुळे मिळालेल्या तुरुंगवासामध्ये त्याने तुझ्या जागी
माझी मदत करावी. 14परंतु तुझ्या संमतीशिवाय मला
काहीही करायचे नव्हते. यासाठी की तुझे कोणतेही चांगले
कार्य दडपणामुळे होऊ नये तर तुझ्या खुशीने व्हावे.

15कदाचित त्याला थोड्या काळासाठी तुझ्यापासून दूर
घेतले जाणे यासाठी झाले असावे की, तू त्याला कायमचे
तुझ्याजवळ घ्यावे. 16एक गुलाम म्हणून नव्हे, उलट
गुलामापेक्षाही चांगला एक भाऊ म्हणून घ्यावे. मी
त्याच्यावर खूप प्रेम करतो. पण तू त्याच्यावर त्याहीपेक्षा
अधिक प्रेम करशील, फक्त एक मनुष्य म्हणूनच नव्हे,
तर प्रभूमधील एक बंधु म्हणून. 17तर जर मग तू मला
खरोखर भागीदार समजतोस, तर माझे स्वागत जसे तू
केले असतेस तसे त्याचे स्वागत कर. 18आणि जर त्याने
तुझे काही नुकसान केले असेल किंवा काही देणे लागत
असेल तर ते माझ्या नावावर लाव.

19मी, पौल, हे माझ्या स्वत:च्या हातांनी लिहीत आहे:
मी याची तुला परतफेड करीन. (मी तुला हे सांगण्याची
गरज नाही की, तुझे स्वत:चे जीवन तू मला देणे लागतोस.)
20होय बंधु, प्रभूमध्ये मला तुझ्यापासून काही फायदा हवा
आहे. ख्रिस्तामध्ये माझे अंत:करण उल्हासित कर. 21तुझ्या
आज्ञाधारकपणाविषयी मला खात्री आहे म्हणून मी तुला
लिहीत आहे. मला माहीत आहे की, मी सांगत असलेल्या
गोष्टीपेक्षा तू अधिक करशील.

22शिवाय कृपा करून माझ्या विश्रांती करिता खोली
तयार करून ठेव. कारण माझा विश्वास आहे की, तुमच्या
प्रार्थनांचा परिणाम म्हणून मला सुरक्षितरीत्या तुमच्या
स्वाधीन करण्यात येईल. 23येशू ख्रिस्तामध्ये माझ्यासह
बंदिवान एपफ्रास 24तसेच मार्क, अरिस्तार्ख, देमास व
लूक जे माझे सहकारी आहेत, ते सलाम सांगतात. 25प्रभु
येशू ख्रिस्ताची कृपा तुमच्या आत्म्याबरोबर असो. आमेन.

---

**पूर्वी तो ... उपयोगी आह**े पौल याठिकाणी अनेसिम हा शब्द
दोन अर्थानी वापरतो. अनेसिम म्हणजे उपयोगी.